# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### मनागपूर मेट्रो प्रवासी संख्या लाखापार  काल (२ ऑगस्ट) रोजी

### रायडरशिप

### १,०३,०३४



नागपूर : सलग चार दिवस ९०,००० चा पल्ला गाठणाऱ्या नागपूर मेट्रोने काल म्हणजे २ ऑगस्ट रोजी १ लाखाचा आकडा पार करत आणखी एक मजल मारली. या आठवड्याच्या पहिल्या ४ दिवस नागपूर मेट्रोची प्रवासी संख्या ९०,००० च्या पलीकडे होती. नागपूर मेट्रोची सातत्याने वाढणारी प्रवासी संख्या सर्व सामान्य नागपूरकरांच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीकडे कल वाढत असल्याचे एक मोठे द्योतक आहे.

नागपूर मेट्रोने गेल्या काही दिवसात आणि प्रवाश्यांच्या हिताखातर आणि मागणीस्तव काही महत्वाचे बदल केले. मेट्रो प्रवासी दरांचे सुसुत्रीकरण आणि सकाळी ८ ते रात्रौ ८ दरम्यान मेट्रो गाड्यांचे संचालन दर १० मिनिटांनी करण्याच्या या निर्णयांमुळे नागरिकांचा मेट्रो प्रवास अधिक सोईस्कर झाला. याचे सुखद परिणाम सातत्याने जाणवत होते आणि या संपूर्ण आठवड्यात वाढलेली प्रवासी संख्या या देखील दोन कारणांमुळे झाली असे म्हटले तर वावगे ठरू नये.

विद्यार्थ्यांकरता प्रवासी भाड्यात असलेल्या ३० टक्के सूट मुळे पालक आपल्या पाल्यांना मेट्रोने पाठवतात. नागपूर मेट्रोच्या रोजच्या एकूण प्रवाश्यांपैकी ३० % विद्यार्थी आहेत हे या विद्यार्थ्यांचा पालकांनी मेट्रोवर दाखवलेला विश्वास आहे. या शिवाय शनिवार-रविवार चा `विकेंड डिस्काउंट' इतर प्रवाश्यांकरता सोयीचे ठरते. शहरात असनेक भागात सुरु असलेल्या कामांमुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते आणि म्हणून मेट्रोने प्रवास करणे सुटसुटीत असल्याचा सर्व सामान्य नागपूरकरांच्या विश्वास असल्याने देखील प्रवासी संख्या वाढते आहे.

नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाल्यापासून नागपूर महानगर पालिकेच्या फिडर बस सेवा रॅशनलाईज झाल्यात. याव्यतिरिक्त व्हॉट्सऍप तिकीट उपलब्ध झाल्यामुळे तिकीट काउंटर वरून तिकीट खरेदी न करता थेट व्हॉट्सऍपच्या माध्यमाने तिकीट खरेदी करण्यास प्रवासी प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले आहे. शिवाय प्रवाश्यांना ऍप किंवा तिकीट व्हेंडिंग मशीन च्या माध्यमाने तिकीट विकत घेता येते; यामुळे तिकटी विक्री खिडकीच्या रांगेत लागायची गरज पडत नाही आणि पर्यायाने प्रवाश्यांच्या वेळेची बचत देखील होते.

गेल्या ५ दिवसांची प्रवासी संख्या:

- २९ जुलै (सोमवार) - प्रवासी संख्या ९३,९४०
- ३० जुलै (मंगळवार) - प्रवासी संख्या ९२,६८७
- ३१ जुलै (बुधवार) - प्रवासी संख्या ९०,०५६
- ०१ ऑगस्ट (गुरुवार) - प्रवासी संख्या ९३,७९०
- ०२ ऑगस्ट (शुक्रवार) - प्रवासी संख्या १,०३,०३४*

उल्लेखनीय आहे कि, नागपूर मेट्रोने प्रवासी तिकीट संरचना केली होती ज्यामध्ये मेट्रो ट्रेनच्या भाड्यात 33% पर्यंत कपात करण्यात आली होती तसेच, विद्यार्थ्यांना महाकार्डवर मिळणाऱ्या 30% डिस्काउंट शिवाय नव्या संरचनेनुसार शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थीकरता हे भाडे जवळपास 50% पर्यत कमी झाले आहे. त्यासोबतच मेट्रो ट्रेनमध्ये (कुठलेही अतिरिक्त भाडे न घेता) सायकल सोबत घेऊन जाण्याची परवानगी देते.

नागपूर मेट्रोच्या खापरी,ऑटोमोटिव्ह चौक, प्रजापती नगर आणि लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन या चारही टर्मिनल स्टेशनवरून मेट्रो सेवा सकाळी 8 ते रात्री 8 वाजता दरम्यान दर 10 मिनिटांनी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ज्याचा फ़ायदा शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच कार्यालयीन कर्मचारी, व्यापारी आणि व्यावसायिक वर्गाला देखील होत आहे